# प्रेसनोट

जा.क्र.पोउआ/वाहतुक/6369/२०१७

पुणे शहर दिनांक १५/०८/२०१७

पुणे शहरातील स्मार्ट सिटी पायलट प्रोजेक्ट अंतर्गत पुणे महानगरपालिकेचे वतीने चतुःश्रृंगी वाहतुक विभागाचे हद्दीत औंध, परिहार चौक पर्यत रस्ते फुटपाथ, चौक व जंक्शन यांची पुर्नःबांधणी व विकसनाचे काम दि.१६/०८/२०१७ रोजीपासून सुरु होणार आहे. तरी दि.१६/०८/२०१७ रोजी ०७.०० वा. पासुन वाहतुकीमध्ये खालील प्रमाणे बदल करण्यात येत आहे.

- परिहार चौक, औंध ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक असा जाणारा रस्ता वाहतुकीस बंद करण्यात येत आहे.
- परिहार चौक, औंध ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौकाकडे जाणा-या वाहनचालकांनी औंध आयटीआय रोड चा वापर करुन सर्जा हॉटेल चौक - उजवीकडे वळुन न्यु डी.पी.रोड - गायकवाड पेट्रोल पंप - डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक अशा रस्त्याचा वापर करावा.
- वेस्टएंड मॉल, रिलायन्स मॉल व भाले चौकातुन डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक, बाणेर बालेवाडीकडे जाणारे वाहनचालकांनी नागरसरोडचा वापर करावा.